TATA

TATA STEEL LIMITED

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street,Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

फॉर्म नं. सीएए. २

(कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३०(३) आणि कंपनीज् (कॉम्प्रोमायझेस, अरँजमेंटस् ॲण्ड ॲमल्गमेशन्स) रुल्स, २०१६ च्या नियम ६ व ७ ला अनुसरून)

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणासमोर

मुंबई येथील खंडपीठ

सीए (सीएए) ३०८३/एमबी/२०१९

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात;

आणि

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३०-२३२ सहवाचता कंपनीज् (कॉम्प्रोमायझेस, अरँजमेंटस् ॲण्ड ॲमल्गमेशन्स) रुल्स, २०१६ च्या प्रकरणात;

आणि

टाटा स्टील लिमिटेड सह आणि मध्ये बामनीपाल स्टील लिमिटेड आणि टाटा स्टील बीएसएल लिमिटेड (पूर्वी भुषण स्टील लिमिटेड अशी ज्ञात) च्या एकत्रिकरणाच्या संयुक्त योजनेच्या प्रकरणात.

टाटा स्टील लिमिटेड)
(सीआयएन: एल२७१००एमएच१९०७पीएलसी०००२६०),)
भारतीय कंपनी अधिनियम, १८८२ अंतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ च्या व्याख्येतील पब्लिक लिमिटेड कंपनी,)
जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट,)
फोर्ट, मुंबई- ४००००१, महाराष्ट्र. ...अर्जदार कंपनी १/हस्तांतरिती कंपनी

टाटा स्टील लिमिटेडच्या समभाग धारकांची सभा बोलावण्याच्या सूचनेची जाहिरात

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी योजना अर्ज क्र. ३०८३/एमबी/२०१९ मध्ये पारित केलेल्या दिनांक २० फेब्रुवारी, २०२० चा आदेश आणि कंपनी अर्ज क्र. १०५६/२०२० मध्ये पारित केलेल्या दिनांक ११ जानेवारी, २०२१, १९ जानेवारी, २०२१ व ५ फेब्रुवारी, २०२१ च्या आदेशांनुसार (एकत्रित उद्धेख **''आदेश'')** नामदार राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने **(''नामदार न्यायाधिकरण'')** टाटा स्टील लिमिटेड सह आणि मध्ये बामनीपाल स्टील लिमिटेड आणि टाटा स्टील बीएसएल लिमिटेड (पूर्वीचे नाव भुषण स्टील लिमिटेड) च्या एकत्रिकरणाची संयुक्त योजना विचारात घेऊन योग्य वाटल्यास मंजुर करण्यासाठी टाटा स्टील लिमिटेड **('हस्तांतरिती कंपनी'/'कंपनी')** च्या समभागधारकांची एक सभा आयोजित करण्याचे निर्देश दिले.

सदर आदेश आणि त्यामधील निर्देशांनुसार याद्वारे पुढे सूचना देण्यांत येते की, सूचनेत सविस्तर मांडलेल्या योजनेला मंजुरी मिळवण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३ **('अधिनियम')** च्या प्रयोज्य तरतुदी, कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ **('सेबी लिस्टींग रेग्युलेशन्स')** च्या अनुपालनांत कंपनीच्या समभाग धारकांची नामदार न्यायाधिकरणाने बोलावलेली सभा **शुक्रवार २६ मार्च, २०२१ रोजी स. ११.०० वा (भाप्रवे)** फक्त व्हीडिओ कॉन्फरन्सिंग **(व्हीसी)**/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स **('ओएव्हीएम')** मार्फत होईल **('सभा')**.

ज्यांचे ईमेल अड्रेस डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट **('डीपीज')**/कंपनीचे रजिस्ट्रार - टीएसआर दारशॉ कन्सल्टंटस प्रायव्हेट लिमिटेड **('आरटीए')**/कंपनी कडे आधीच नोंदवले आहेत व ज्यांची नावे १२ फेब्रुवारी, २०२१ **('कट-ऑफ डेट')** रोजीस सभासदांच्या नोंदवहीत/डिपॉझिटरीजनी सादर केलेल्या तपशिलांनुसार लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत आढळली त्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून शुक्रवार, १९ फेब्रुवारी, २०२१ रोजी सभेची सूचना पाठवणे कंपनीने पूर्ण केलं आहे.

इतर बाबींसोबत कंपनीज (कॉम्प्रोमायजेस, अरँजमेंटस अँड अमालगमेशन्स) रुल्स, २०१६ च्या नियम ६ सहवाचत अधिनियमाच्या कलम २३०, २३२ व १०२ अंतर्गत योजना, स्पष्टीकरणात्मक निवेदनासह सूचनेची एक प्रत कंपनीची वेबसाईट https://www.tatasteel.com/investors/amalgamation/ येथे आणि एनएसडीएल ची वेबसाईट www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध करून दिली आहे. त्याशिवाय सूचना स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस म्हणजेच बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वर संबंधित अनुभागांत सुद्धा उपलब्ध करून दिली आहे. जर कोणत्याही सभासदाची सूचना आणि/किंवा योजनेची एक प्रत प्राप्त करण्याची इच्छा असेल तर कंपनीकडे cosec@tatasteel.com येथे एक विनंती पाठवावी किंवा ती सभेच्या तारखेपर्यंत स. १०.०० आणि दु. १२.०० (भाप्रवे) दरम्यान टाटा स्टील लिमिटेड च्य नोंदणीकृत कार्यालयातून बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथून कोणत्याही कामाच्या दिवशी (शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्या सोडून) विनामुल्य मिळू शकतील.

ही सभा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत होत असल्याने, कंपनीच्या समभागधारकांनी प्रतिपत्रीनां नियुक्त करण्याची सुविधा ह्या सभेत उपलब्ध नाही.

नामदार न्यायाधिकरणाने सभेचे अध्यक्ष होण्यासाठी कंपनीचे संचालक श्री. एन. चंद्रसेकरन किंवा ते नसल्यास श्री. ओ. पी. भट्ट यांची नियुक्ती केली आहे.

समभागधारकांनी योजनेला मंजुरी दिल्यास त्यानंतर ती नामदार न्यायाधिकरणच्या मंजुरीच्या व आवश्यक अशा नियामक आणि अन्य प्राधिकरणाच्या मंजुऱ्या, परवानग्या आणि मान्यतांच्या अधीन असेल.

टपाल मतदान आणि रिमोट-ई-व्होटींग :

i) अधिनियमाच्या कलम २३०(४) सहवाचता कलम १०८ आणि ११०, ii) कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि २२, iii) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन, ४४, iv) वेळोवेळी सुधारित केलेल्या सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने जारी केलेल्या दिनांक १० मार्च, २०१७ च्या सर्क्युलर क्र. सीएफडी/डीआयएल३/सीआयआर/२०१७/२१ (प्रयोज्य असेल त्या प्रमाणांत) च्या अनुपालनांत कंपनी सभासदांना टपाल मतदानाने आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड **('एनएसडीएल')** ने देऊ केलेल्या रिमोट ई-व्होटींग सुविधा (सभेच्या आधी तसेच सभेमध्ये) वापरून मत देण्याचा त्यांचा अधिकार वापरण्याची सुविधा पुरवत आहे.

टपाल मतदान आणि रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी तसेच सभेमध्ये) साठी तपशिलवार निर्देश सूचनेत दिले आहेत. सभासदांनी कृपया खालील गोष्टींची नोंद घ्यावी :

ए. टपाल मतदान आणि रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी) ची सुरुवात बुधवार, २४ फेब्रुवारी, २०२१ रोजी स. ९.०० वा (भाप्रवे) होईल आणि गुरुवार, २५ मार्च, २०२१ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल. त्यानंतर मतदानासाठी एनएसडीएल कडून ई-व्होटींग मॉड्युल निष्क्रिय केलं जाईल.

बी. टपाल मतदानाने आणि रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी तसेच सभेमध्ये) मार्फत मतदानासाठीचे सभासदांचे मतदान अधिकार **शुक्रवार, १२ फेब्रुवारी, २०२१** ह्या कट-ऑफ डेट रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या आणि भांडवलाच्या त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणांत असतील. फक्त कट-ऑफ डेट रोजीस सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत जीचे नाव नोंदवलेले असेल ती व्यक्तीच टपाल मतदान आणि रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी तसेच सभेमध्ये) सुविधा वापरण्यास हक्कदार असेल.

सी. कोणत्याही व्यक्तीने कट-ऑफ डेट नंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आणि कंपनीची सभासद बनली व सभेची कार्यवाह पाहण्यास इच्छुक असेल ती evoting@nsdl.co.in येथे एनएसडीएल ला एक विनंती पाठवून लॉगीन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते किंवा त्यासाठी कंपनी/आरटीए कडे विनंती करू शकते. तथापि, अशी व्यक्ती एकतर टपाल मतदानाने किंवा रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी तसेच सभेमध्ये) मार्फत ठरावावर मत देण्यास हक्कदार नसेल.

डी. इलेक्ट्रॉनिक व्होटींग सिस्टीम मार्फत मतदानाची सुविधा सभा संपल्यानंतर १५ मिनिटांपर्यंत सभेच्या व्हीसी/ओएव्हीएम कार्यवाही मध्ये ही उपलब्ध करून दिली जाईल. ज्यांनी टपाल मतदान किंवा रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी) द्वारे त्यांचे मत आधीच दिले नसेल अशा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासदांना सभेमध्ये मत देण्याचा त्यांचा अधिकार वापरणे शक्य होईल.

ई. ज्या सभासदांनी टपाल मतदान किंवा रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी) मार्फत त्यांचे मत आधीच दिले असेल ते सभेत सहभागी होण्यास पात्र असतील परंतु सभेत ठरावावर पुन्हा त्यांचे मत देण्यास हक्कदार नसतील.

एफ. सभेपूर्वी किंवा सभेमध्ये ज्या सभासदांना सहाय्य हवे असेल ते एनएसडीएल शी (श्री. अमित विशाल, सिनियर मॅनेजर किंवा श्रीमती पल्लवी म्हात्रे, मॅनेजर) evoting@nsdl.co.in किंवा १८००-१०२०-९९०/१८००-२२-४४-३० वर संपर्क साधू शकतात.

ज्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेसेस कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटस/कंपनीचे आरटीए यांच्याकडे नोंदवलेले नसतील ते सूचना आणि रिमोट ई-व्होटींग साठी लॉगीन आयडी व पासवर्ड सह रिमोट ई-व्होटींग साठीची प्रक्रिया प्राप्त करण्याकरिता शुक्रवार, १९ मार्च, २०२१ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे) किंवा त्यापूर्वी खालील प्रक्रिया अनुसरून आरटीएकडे त्यांचे ई-मेल ॲड्रेसेस नोंदवून घेऊ शकतात.

ईमेल पत्ते एकवेळ नोंदविण्यासाठी सभासदांनी अवलंब करण्याची प्रक्रिया:

I. इलेक्ट्रॉनिक स्वरुपात समभाग धारण केलेल्या सभासदांसाठी:

ए) लिंक ला भेट द्या : https://green.trsdarashaw.com/green/events/login/ti
बी) डीपी आयडी आणि क्लाईंट आयडी, पॅन तपशिल आणि कॅप्टचा कोड नमुद करावा.
सी) सिस्टम क्लाईंट आयडी आणि पॅन तपशिलाची पडताळणी करेल.
डी) पडताळणी यशस्वी झाल्यावर सिस्टम भागधारकाला ई-मेल पत्ता आणि मोबाईल नंबर नमुद करण्याची परवानगी देईल.
ई) ई-मेल पत्ता आणि मोबाईल नंबर नमुद करावा.
एफ) सिस्टम नंतर सूचना पाठविण्याच्या मर्यादित हेतुकरिता ई-मेल पत्ता निश्चित करेल.

II. प्रत्यक्ष स्वरुपात समभाग धारण केलेल्या सभासदांसाठी:

ए) लिंक ला भेट द्या : https://green.tsrdarashaw.com/green/events/login/ti
बी) प्रत्यक्ष फोलिओ नंबर, पॅन तपशिल आणि कॅप्टचा कोड नमुद करावा.
सी) पॅन तपशिल नोंदीवर उपलब्ध नसल्यास, भागधारकांनी एक शेअर प्रमाणपत्र नंबर नमुद करावा. (जर भागधारक अनेक शेअर प्रमाणपत्र धारण करत असेल तर कोणत्याही एका शेअर प्रमाणपत्राचा क्रमांक)
डी) सिस्टम फोलिओ क्रमांक आणि पॅन तपशिल किंवा शेअर प्रमाणपत्र नंबराची पडताळणी करेल.
ई) पडताळणी यशस्वी झाल्यावर सिस्टम भागधारकांना ई-मेल पत्ता आणि मोबाईल नंबर नमुद करण्याची परवानगी देईल.
एफ) ई-मेल पत्ता आणि मोबाईल नंबर नमुद करावा.
जी) पॅन तपशिल उपलब्ध नसल्यास सिस्टम पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत अपलोड करण्यासाठी सभासदांना सांगेल.
एच) सिस्टम नंतर सूचना पाठविण्याच्या हेतुकरिता ई-मेल पत्ता निश्चित करेल.

ई-मेल पत्ता यशस्वीपणे नोंदवल्यानंतर नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडकडून अशा नोंदवलेल्या ई-मेल पत्त्यावर रिमोट ई-व्होटींग साठी लॉगीन आयडी आणि पासवर्ड सह सूचनेची एक प्रत पाठवली जाईल. कोणत्याही चौकशीसाठी सभासद csg-unit@tsrdarashaw.com किंवा evoting@nsdl.co.in कडे लिहू शकतात.

नामदार न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशांनुसार मे. पारिख अँड असोसिएट्स, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरीजचे श्री. पी. एन. पारीख (सभासदत्व क्र. एफसीएस ३२७ आणि सीपी क्र. १२२८) किंवा ते नसल्यास श्रीमती जिग्यासा वेद (सभासदत्व क्र. एफसीएस ६४८८ व सीपी क्र. ६०१८) किंवा त्या नसल्यास, श्री. मितेश धाबलीवला (सभासदत्व क्र. एफसीएस ८३३१ आणि सीपी क्र. ९५११) हे टपाल मतदान आणि रिमोट ई-व्होटींग (सभेच्या आधी तसेच सभेमध्ये) मार्फत मतदान प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शीपणे पार पाडून सभा संपल्यापासून ४८ तासांत सभेच्या अध्यक्षांना दिलेल्या मतांवरील अहवाल सादर करण्याकरिता तपासणी अधिकारी म्हणून कृती करतील.

मतदानाचा निकाल तपासणी अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर सभा समाप्तीच्या ४८ (अठ्ठेचाळीस) तासांत घोषित केला जाईल आणि ते कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर प्रदर्शित केला जाईल त्याशिवाय सदर तारखेस बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडला पाठवली जाईल.

कोणत्याही चौकशीच्या बाबतीत सभासद www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन येथे उपलब्ध भागधारकांसाठी फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्युज) आणि भागधारकांसाठी ई-व्होटींग युजर मॅन्युअल पाहू शकतात किंवा टोल फ्री क्रं. १८००-१०२०-९९०/१८००-२२-४४-३० वर कॉल करू शकतात किंवा evoting@nsdl.co.in वर एक विनंती पाठवू शकतात.

टाटा स्टील लिमिटेड साठी
सही/-
एन. चंद्रसेकरन
सभेसाठी नियुक्त केलेले अध्यक्ष
डीआयएन : ००१२१८६३

२२ फेब्रुवारी, २०२१
मुंबई

TATA STEEL

जाहीर सूचना

जनतेला याद्वारे कळवण्यात येते की मयत सौ. पूजा अरुण कौलगुड या त्यांचे पती श्री. अरुण विठ्ठल कौलगुड यांच्यासह फ्लॅट क्र. ३२, मोजमापीत ४७२ चौ.फू. चटई क्षेत्र, इमारत क्र.२, २रा मजला, चेंबुर वैभव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, शंकर नगर ५, शेल कॉलनी, चेंबुर, मुंबई ४०० ०७१ आणि चेंबुर वैभव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड्चे जारी शेअर प्रमाणपत्र क्र.१२ मध्ये संलग्नीत विभिन्न क्र. ५६ ते ६०(दोन्ही एकत्रित) धारक प्रत्येकी रु. ५०/- च्या दर्शनी मूल्याचे ५ पूर्ण भरणा शेअर्स (मिळकत)चे संयुक्त धारक आहेत. सदर सौ. पूजा अरुण कौलगुड यांचे १२.०८.२०१७ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्च्यात त्यांचे पती श्री. अरुण विठ्ठल कौलगुड आणि त्यांचा मुलगा श्री. गुरुराज अरुण कौलगुड हे त्यांच्या मृत्युच्या वेळी केलेल्या कायद्यानुसार त्यांचे एकमात्र वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत.

वरीलसदर श्री. अरुण विठ्ठल कौलगुड आणि श्री. गुरुराज अरुण कौलगुड यांना याचावून कोणतीही इतर व्यक्तीनां सदर मिळकत किंवा त्यावरील कोणत्याही भागावर कोणताही दावा, हक्क, नामाधिकार, शेअर, हितसंबंध, मागणी, आक्षेप जसे की, विक्री, हस्तांतर, अदलाबदल, कुळवहिवाट, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, गहाण (समभाग किंवा अन्यकाही), बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, विश्वस्त, वारसाहक्क, सुविधाधिकार, अभिहस्तांतर, परवाना, मयत, विभागणी, प्रतीज्ञा, हमी, कौटुंबिक व्यवस्था, कुळ-मुखत्यारपत्र, कर्ज, अँडव्हांसेस, संपादन, भार, निषेधाज्ञा किंवा कोणतीही इतर जप्ती किंवा कोणत्याही न्यायालयाद्वारे मंजुर कोणताही आदेश, हुकुम किंवा पुरस्कार, चिरभोगाचा हक्क किंवा अग्रक्रयाधिकार किंवा ॲपरेशन ऑफ लॉ द्वारे दावे असल्यास त्यांनी सदर लिखित निम्नस्वाक्षरीकारांच्या पत्त्यावर : ७/१०, बोटवाला इमारत, कार्यालय क्र.१, ३रा मजला, हॉर्निमन सर्कल, फोर्ट, मुंबई-४०० ०२३ येथे या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, अन्यथा आक्षेप किंवा दावे जर असल्यास ते त्यागित समजण्यात येतील.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१.

कु. स्मिता सावंत
वकील, उच्च न्यायालय, मुंबई

जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल म्हणजेच श्री. माधव दद्दाभाई शेठागिया यांचे श्री गणेश बेंग्रा को. ऑप. हाऊ. सोस. लि. द्वारे जारी मूळ शेअर प्रमाणपत्र समाविष्टीत त्यासंबंधीत सर्व चूकत आणि अनुषंगिक लिखित आणि पॉट क्र. एफ-१०३, बेंग्रा अपार्टमेंट, लेपोरा स्ट्रीट, माहीम(पश्चिम), जिल्हा-ठाणे ४०१ १०च्या संदर्भातील मे. ए-१ बिल्डर्स आणि माझे अशिल
यांच्यातील आणि द्वारे निष्पादित २ डिसेंबर १९८५ रोजीचा मूळ विक्रीकरितानचा करार हा हरवला किंवा गहाळ झाला आहे.

कोणत्याही व्यक्तीनां वरीलसदर करार, शेअर प्रमाणपत्र आणि त्या संदर्भातील इतर चूक आणि अनुषंगिक लिखित च्या संबंधित कोणताही हक्क किंवा कोणताही इतर दावा किंवा त्याचा कब्जा असल्यास मला **विनायक पांडुंट**, जी/ए-२, कोमल टॉवर, पटेल नगर, स्टेशन रोड, माहीम (पश्चिम), जिल्हा-ठाणे ४०१ १०२ येथे या दिनांकापासून १४ दिवसांत कळवावे, ज्यां केल्यास वरीलसदर फ्लॅट किंवा वरीलसदर करार, शेअर प्रमाणपत्र आणि त्या संदर्भातील इतर चूक आणि अनुषंगिक लिखित च्या संबंधित कोणताही हक्क, दावा किंवा मागणी किंवा धारणाधिकार नसल्याचे मानले जाईल.

संदर्भ/क्र/ पीएम/०२४/२०२१.
दि. २३ फेब्रुवारी २०२१

सही/-
पी.हरी
[वकील, उच्च न्यायालय, बांद्रे]

शुद्धीपत्र

१९ फेब्रुवारी, २०२१ रोजी इंग्रजी मध्ये प्री प्रेस मध्ये आणि नवशक्ती करीता मराठीमध्ये भाषांतर केलेली सोसायटी **(मालाड लालदास को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड)** द्वारे के. महेंद्र रायलाल दागली करीता प्रकाशित सूचना.

२ ऱ्या परिच्छेदात १० फेब्रुवारी, २०२१ दिवांकीत सोडून दिल्याचा विलेख नी कौटुंबिक व्यवस्थेचा विलेख याचे नवशक्ती मध्ये चुकून १० जानेवारी, २०२१ असे छापले गेले आहे. कृपया नवशक्तीमध्ये १० फेब्रुवारी, २०२१ असे वाचावे.

ठिकाण: मुंबई **दिनांक:** २३.०२.२०२१

मुंबई येथील लघु वाद न्यायालयातील आर. ए. डी. वाद क्र. ६७३ सन २०१९ मधील

मर्जी क्र. ३८५ सन २०१७

श्रीम. ज्योती महेंद्रकुमार देसाई)
वय ७० वर्ष, व्यवसाय : हाऊस वाईफ)
राहणार २०२-II, सी क्रेस्ट को-ऑप.)
सोसायटी, ७ बंगलो, वर्सोवा,)
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००६१)
...**वादी**

विरुद्ध

१. रविंद्र मुकुंद चाफे,)
वय ३६ वर्ष, पेशा : व्यवसाय,)
त्यांचा पत्ता : फ्लॅट क्र. २,)
ए१ ताब्रेया कोर्ट, नेताजी सुभाष)
रोड, ६९, मरिन ड्राईव्ह,)
मुंबई - ४०००२०.)
२. अन्नामलाई मुथू अय्यापन,)
वय ५१ वर्ष, पेशा : व्यवसाय,)
राहणार फ्लॅट क्र. ६, २रा मजला,)
ए१ ताब्रेया कोर्ट, नेताजी सुभाष)
रोड, ६९, मरिन ड्राईव्ह,)
मुंबई - ४०० ०२०.)
३. शेख जाबेर अब्दुल्लाह जे. ए१ सबाह,)
कुवेती नॅशनल, राहणार कुवेत)
पी.ओ. बॉक्स १७७१ येथे,)
सफात १३०१८, कुवेत, त्यांच्या)
घटीत मुख्तीयार च्या माध्यमातून,)
नबील राशिद गनी, भारतीय)
रहिवाशी, राहणार येथे हाजी मिया)
पटेल मंझिल, फ्लॅट क्र. ६,)
२रा मजला, ९५, डॉ. ए.)
आर. नायर रोड, अग्रीपाडा,)
मुंबई - ४०० ०११.)
...**प्रतिवादी**

प्रति,
उपरीनामित प्रतिवादी क्र. २

ज्याअर्थी, उपरीनामित वादींनी प्रतिवादींविरुद्ध आर. ए. डी वाद क्र. ६७६ सन २०११ मधील दिनांक ०२ डिसेंबर, २०१७ चा अर्ज म्हणजेच मर्जी अर्ज क्र. ३८५ सन २०१७ काढून त्यात विनंती केली की, मर्जी अर्ज दाखल करण्यात झालेल्या १४२ दिवसांच्या विलंबास माफी मिळावी आणि सदर अर्जात विनंती केलेल्या अशा अन्य व पुढील अनुतोषांसाठी.

तुम्हाला याद्वारे अर्जा विरुद्ध कारणे दाखवण्याकरिता ०२ मार्च, २०२१ रोजी दु. २.४५ वा. व्यक्तीशः किंवा रितसर निर्देश दिलेल्या प्राधिकृत वकिला मार्फत न्यायालय खोली क्र. ६, ०२रा मजला, जुनी इमारत, लघु वाद न्यायालय, एल. टी. मार्ग, मुंबई - ४०० ००२ मधील पीठासीन न्याय. न्यायाधिशांसमोर हजर होण्याची ताकीद देण्यांत येते, कसूर केल्यास, सदर अर्जावर एकतर्फे सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

सदर अर्जाची प्रत तुम्ही ह्या न्यायालयाच्या न्यायालय खोली क्र. ६ मधून प्राप्त करू शकता.

न्यायालयाच्या शिक्क्याने ह्या ०९ मार्च, २०२० रोजी दिले.

सही/-
ॲडिशनल रजिस्ट्रार

जाहीर सूचना

सामान्य जनतेने सूचना घ्यावी की, विशेष सर्वसाधारण सभा दि. ०८.११.२०२० मधे, आमचे अशिल कैलाश नगर न्यू कांदिवली सीएचएस लि., मोंदणी क्र. (बीओएम/एसएमजी/९३४ सन ९५) अंतर्गत नोंदणीकृत, प्लॉट क्र. ६१, कैलाश नगर, शंकर लेन, कांदिवली (प.), मुंबई ६७ येथे स्थित गाव मालाड (उत्तर), तालुका बोरीवली च्या सी.टी.एस. क्र. ४३१-ए, ४३१/१ ते ४३९/३४ धारक (सदर मिळकत) अमूर, आमच्या अशिलांकडून मे. अंबो हाऊसिंग इंडिया प्रा. लि., कार्यालयीन पत्ता सांताक्रुज पॉर्क, ५ वा मजला, बिल्डिंग क्र. १२०, गुरु बरगॉदिवली रोड, अंधेरी (पू), मुंबई-९३ यांची १४० सभासद असलेल्या सोसायटीच्या झालयांच्या पुनर्विकासाबाबी निवुली केली होती, ती आमच्या कायदेशीर सूचना दि. १७.०२.२०२१ द्वारे काढून घेण्यात आणि रद्द करण्यात आली आहे, उच्च न्यायालय ओओसीबी खटला क्र. ८७८ सन २०११ मधे दाखल केलेल्या संमत अटी दि. १२.०४.२०१३ च्या अटी व शर्तीचा विकासक म्हणून त्यांनी भंग केला आहे, ते आता विफल झाले आहेत आणि विहीत वेळेमध्ये सोसायटीच्या पुनर्विकास पुर्ण करण्यास अयशस्वी झाले आहेत तसेच माझ्या अशिलांच्या हिससंबंधांस अहितकारी कृती केली आहे. आम जनतेने मे. अंबो हाऊसिंग इंडिया प्रा. लि. यांच्यासोबत सदर मिळकतीशी संबंधित कोणत्याही स्वरूपाचे व्यवहार करू नोंत.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी.

सही/-
महेंद्र खिमजी शाह, वकिल उच्च न्यायालय
पियुष महेंद्र शाह, वकिल आणि सॉलिसिटर, इंग्लंड ॲण्ड वेल्स
४०६, हमाम हाऊस, हमाम स्ट्रिट, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१

TATA MUTUAL FUND

NOTICE CUM ADDENDUM

This notice cum addendum sets out changes to be made in the Scheme Information Document(s)(SID) & Key Information Memorandum(s)(KIM) of all the Scheme(s) of Tata Mutual Fund.

Borivali Branch of Tata Asset Management Ltd. (TAML) will be shifted from 24th February 2021 to the address below:

New Address: Shop No. 1 & 2, Ground Floor, Ganjawalla Residency, Ganjawalla Lane, Borivali West, Mumbai - 400092.

Notes: -

- This notice cum addendum forms an integral part of the SIDs & KIMs.
- All other terms & conditions of the SIDs & KIMs read with other addendums if any remain unchanged.

Mutual Fund Investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

Corporate Identity Number: TAML - U65990-MH-1994-PLC-077090

महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई

(महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ सन २०१४ द्वारा स्थापित)
२रा व ६वा मजला, एमटीएनएल बिल्डिंग, टेक्नॉलॉजी स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई, महाराष्ट्र-४०० ०७६.

कॉम्प्युटर लॅब फर्निचर सेटअप साठी स्वारस्याच्या अभिव्यक्ती (ईओआय) करिता निमंत्रण

हे काम पूर्ण करण्याकरिता वेळः खरेदी आदेशाच्या तारखे पासून २० दिवस
अर्ज शुल्कः १०००/- (विना-परतावा)
(मुंबई येथे देय महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबईच्या नावातील डीडी ने)
ईओआय प्रारंभ तारीखः २२.०२.२०२१
ईओआय समाप्ती तारीखः ०८.०३.२०२१

इच्छुक पुरवठादार वेबसाईट www.mnlumumbai.edu.in ला भेट देऊन **रिस्पॉन्स फॉर्म** (जोडपत्र ए) डाऊनलोड करू शकतात. सर्व बाबतीत संपूर्ण भरलेला फॉर्म ई-मेल द्वारा eoi@mnlumumbai.edu.in येथे आणि रजिस्टर्ड पोस्टने रजिस्ट्रार, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई, २रा मजला, सीईटीएमएल-एमटीएनएल बिल्डिंग, हिरानंदानी गार्डन्स, टेक्नॉलॉजी स्ट्रीट, पवई, मुंबई-४०० ०७६ येथे पाठवू शकतात. वरील प्रमाणे दस्तावेज आणि डीडी असलेल्या पाकिटावर स्पष्टपणे पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व वेबसाईट असल्यास त्यासह ई-मेल ॲड्रेस नमूद करून ठळक अक्षरांत **कॉम्प्युटर लॅब फर्निचर सेटअप साठी ईओआय** असे लिहावे. कृपया सर्वसाधारण निर्देश कालजीपूर्वक वाचावेत दस्तावेज बुधवार, १० मार्च, २०२१ च्या सं. ५.०० वा. किंवा त्यापूर्वी पोहोचणे आवश्यक आहे. स्वहस्ते पोचवू नयेत.

रजिस्ट्रार
महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई